श्रीक्षेत्र

# दक्षिण प्रयाग

अथवा

निरानृसिंहपूर येथील

## संक्षिप्त वर्णन.

संपादक--आत्माराम दत्तात्रय दंडवते.

शके १८४५.

किंमत १ आणा.

श्रीक्षेत्र

# दक्षिण प्रयाग

अथवा

निरानृसिंहपूर येथील

## संक्षिप्त वर्णन.

संपादक—आत्माराम दत्तात्रय दंडवते

---

शके १८४५

किंमत १ आणा.

प्रकाशक–गोपाळराव कृष्णराव दंडवते.
निरानृसिंहपूर.

मुद्रक—रा. रा. शंकर नरहर जोशी, चित्रशाळा प्रेस,
१०२६ सदाशिव पेठ, पुणें.

॥ श्री लक्ष्मीनृसिंह ॥

## श्रीक्षेत्र दक्षिण प्रयाग

# माहात्म्यवर्णन.

॥ प्रयागइतिविख्यातः प्रयागात्कोटिपुण्यदः ॥ नीराभीमरथीयोगंयेशृण्वंतिविदूरतः॥१॥ येनानायोनिगंतारोयेनानानरकार्दिताः ॥ तेमुच्यंतेक्षणादेवनीराभीमांबुतर्पणात् ॥ २ ॥ यत्रश्रीमान्नृहरिः कैवल्याद्यखिलार्थदाः॥ भक्तानुग्रहवानास्तेसरूपारूपवानपि ॥ ३ पद्मपु० नृसिंह० अध्याय २ ॥.

२ श्रीक्षेत्र दाक्षिणप्रयाग ( निरानृसिंहपूर ) हे अत्यंत प्राचीन कालापासून क्षेत्राचे ठिकाण असून या स्थानाचा सविस्तर महिमा श्री वेदव्यासप्रणीत पद्मपुराणांतर्गत श्री नृसिंहपूर माहात्म्यामध्यें सोपपत्तिक व विस्तृत रीतीने वर्णन केला आहे.

त्याचे थोडक्यांत दिग्दर्शन असें कीं पूर्वीपासून

दैत्य हे देवाचे शत्रु होत. परंतु दैत्यकुलोत्पन्न भगवत्‌भक्त प्रल्हाद हा या गोष्टीस अपवादात्मक असून तो अत्यंत विष्णुभक्त होता. त्यानें देवर्षी नारदांच्या अनुग्रहावरून या पवित्र क्षेत्रांत राहून या ठिकाणीं अतिशय उग्र तपश्चर्या केल्यामुळें त्याच्यावर श्री नृसिंहाची पूर्ण कृपा झाली. व त्याला एवढी मोठी दिव्य शक्ति प्राप्त झाली कीं त्याच्या नाशाकरितां हिरण्यकशिपू ( पित्या ) नें अनेक प्रकारचें उपाय योजिले असतांही तो त्या सर्व संकटापासून मुक्त झाला. व त्या भक्तवत्सल प्रभूनें प्रल्हादाचें वेळोवेळीं रक्षण करून ‘ परित्राणायसाधूनां ’ या आपल्या उक्तीची सत्यता सर्व जगाला पूर्ण सिद्ध करून दाखविली. तो भक्तवत्सल प्रभू भगवान्‌ श्री नरहरी भक्तांचें मनोरथ पूर्ण करण्याकरितां या क्षेत्रामध्यें निरंतर वास्तव्य करीत आहे.

२ दक्षिणप्रयाग हे क्षेत्र पंढरपूरक्षेत्राचे नैऋत्य बाजूस चोवीस मैलाचे व जी० आय० पी रेलवेचे कुर्डवाडी स्टेशनपासून वीस मैलाचें

अंतरावर आहे. हे क्षेत्र सर्वत्र भागवत धर्मा-नुयार्या लोकांची पवित्र अशी यात्राभूमी आहे. याबद्दल संतांचे मुगुटमणि श्री तुकाराम महाराज यांनीं या क्षेत्राचें वर्णन पुढील अभंगांत असें केलें आहे. नि० सा० प्रे० तु० गा० अ. ४३२४

**उमारमा एकसरी । वाराणसीते**
**पंढरी ॥ गया ताचि गोपाळपूर ॥**
**प्रयाग निरानरसिंहपूर ॥**

महाराजांच्या वरील उद्गारावरून या क्षेत्राचें महत्व किती मोठें हें सहज समजण्यासारिखे आहे. परंतु या अभंग वाणीचा हल्लीच्या वारकरी संप्रदायी म्हणविणाऱ्या महंतांनीं व त्यांचे श्रद्धाळू अनुयायी मंडळांनीं या क्षेत्रावर असलेली तुकाराम महाराजासारख्या भागवत धर्म प्रवर्तकांची निष्ठा लक्षांत घेऊन तदनुसार वर्तन करणे अवश्य आहे. कारण जे भाविकजन पंढरीक्षेत्रास ( दक्षिणकाशी ) यात्रेकारितां येणारे असतील त्यांनीं अगोदर या दक्षिणप्रयाग क्षेत्राची यात्रा केल्यांवाचून त्यांची ती पंढरीची

यात्रा संप्रदायपूर्वक पूर्ण होत नाहीं हें सहज सिद्ध होईल.

कारण जसें– उत्तरकाशीयात्रेस जाणाऱ्या प्रत्येक भक्ताला अगोदर उत्तरप्रयागची यात्रा करावी लागते असा नियम आहे. त्याशिवाय त्याचे तें काशीयात्रेस जाणें हें यात्रेच्या धार्मिक दृष्टीनें त्याला अयोग्य आहे. तोच नियम या दक्षिणकाशी यात्रेसही अगदीं तंतोतंत लागू पडतो. हे कोणीही सूज्ञ मनुष्य कबूल केल्या-वाचून रहाणार नाहीं असें असतां हल्लींच्या वार-करी संप्रदायी मंडळींनीं आजपर्यंत या गोष्टीचा शोधक बुद्धीने विचार केलेला दिसून येत नाहीं सबब या गोष्टीकडे दुर्लक्ष न करितां वरील नियम वारकरी मंडळींनीं आचरणांत आणून श्री तुकाराम महाराजांनीं सांगितल्याप्रमाणें पंढरी च्या यात्रेचें संप्रदायशुद्ध पुण्य व श्रेय आपल्या पदरीं ध्यावे म्हणून महाराजांच्याच प्रेरणेंवरून हा प्रेमाचा संदेश सर्व भागवत धर्माभिमानी लोकांस कळवित आहोंत. इकडे लक्ष देऊन

त्यांनीं या गोष्टीचा अवश्य विचार करावा. व असें केल्यानें श्री तुकाराम महाराजांच्या मनोगता प्रमाणें व आज्ञेप्रमाणें वागल्याचें श्रेय अनायासें मिळविल्यासारिखे होईल.

२ आर्यावर्तातील दक्षिण दिशेच्या या त्रिस्थली यात्रांचें म्हणजे प्रयाग ( निरानरसिंहपूर) काशी ( पंढरपूर ) गया ( गोपाळपूर ) या यात्रांचें महत्त्व फार मोठें आहे. तसेंच या दक्षिणप्रयाग क्षेत्रामध्यें निराभीमरथीचें संगमात स्नान केल्यानें मनुष्य देहावर धर्मशास्त्रदृष्ट्या असलेल्या देव, ऋषि, पितर, या तीनहीं ऋणातून त्याची मुक्तता होते. असें महर्षींनीं या क्षेत्राचें माहात्म्य वर्णन केलें आहे.

या क्षेत्राचें व क्षेत्रासभोंवतीं असलेल्या इतर तीर्थादिकांचें सविस्तर वर्णन दक्षिणप्रयाग-महात्म्य या ग्रंथांत केलें आहे. ते जिज्ञासू वाचकानीं वाचून आपली इच्छा पूर्ण करून घ्यावी. सदहू ग्रंथ जीर्णोद्धार संस्थेकडून मागविल्यास मिळेल. याखेरीज येथील पुराणप्रसिद्ध निरा

आणि भीमा या महानद्यांचे संगमावर सांप्रत जे श्रीनरसिंहाचें रमणीय व भव्य मंदिर आहे त्या मंदिराचा जीर्णोद्धार कोणी व कसकसा केला हे पुढील त्रोटक माहिती वरून कळून येईल.

४ कै० श्री. सरदार विठ्ठलराव शीवदेव दाणी हे मुळचे सासवडचे राहणारे असून पुढें त्यांनीं श्री. पहिले बाजीरावपेशवे यांचे पदरीं राहून भगवत्कृपेनें आपल्या स्वपराक्रमावर त्यांचे कडून सरदार ही पदवी मिळविली. नंतर ते विंचूर येथें राहूं लागले, म्हणून त्यांना विंचूरकर असें लोक म्हणूं लागले. पुढें कै० विठ्ठल शिवदेव यांनीं श्रीक्षेत्र निरानरसिंहपूर येथील आपला कुलस्वामी जो श्रीलक्ष्मीनरसिंह त्यांचे जे अगदीं लहान व जीर्ण असें मंदीर होतें तें वरील दोनही नद्यांचे संगमामध्यें असल्यानें पाण्याच्या प्रवाहामुळें या देवालयांस धक्का लागणे संभवनीय आहे असे दूरदर्शित्वानें जाणून आपले गुरु अमृतस्वामी मर्ढेकर यांच्या आज्ञेवरून चिरकाल रहावे अशा संकल्पानें

अतिशय खोल व मजबूत असा या देवालयाचा पाया घालून त्यावर विस्तीर्ण व रमणीय मंदिराचें काम शके १६७८ धातानाम संवत्सराचे चैत्रशुद्ध १ संपूर्ण करून श्रीप्रल्हादकृत वालुकामय नृसिंहमूर्ती व ब्रह्मदेवकृत श्रीशामराजमूर्ती अशा उभयमूर्ती सिंहासनारूढ केल्या. व श्रीनृसिंहास बहुमोल जवाहीर अर्पण करून श्रीनरहरींची सेवा आपल्या घराण्याकडून निरंतर व्हावी या सदिच्छेनें श्रींची नित्यपूजा, नैवेद्य, नंदादीप, राजोपचार उत्साह हीं कामें अव्याहत चालावी म्हणून गुजराथ प्रांतापैकीं सुरत जिल्ह्यातील उरपाड महालांतून दरसाल ६००० रुपयांची नेमणूक चालू केली असून ती अद्यापपर्यंत श्रींकडे अबाधित चालू आहे. यानंतर त्यांचे चिरंजीव श्री. शिवाजीराव विठ्ठल यांनीं आपल्या पूर्वजांचे अनुकरण करून सदर देवालयाचा विस्तीर्ण असा रंगशिला असलेला दगडीमंडप तसेंच पश्चिम महाद्वार त्याजवरील नगारखानाहीं

कामें पुष्कळ खर्चानें केली. पुढें त्यांचे वंशज विठ्ठलराव नरसिंह यांनीं प्रल्हादाचे मंदिरापर्यंत भव्य असा लांकडीसभामंडप व पूर्व महाद्वारवरील लांकडीमंडप बांधविला व तसेंच पुढें वेळोवेळीं त्यांचे वंशातील थोर पुरुषांनीं आपल्या पूर्वजांचें संस्मरणीय अनुकरण म्हणून श्रींची सेवा याना त्यानें देवालयाचे पश्चिमबाजूचे दोन्ही बुरुज तसेच निरा नदीचे घाटाचा बुरुज वगैरे कामें अत्यंत श्रद्धेनें व पुष्कळ खर्चानें शके १७८७ कार्तिक वद्य ५ रोजीं पूर्ण केलीं,

याशिवाय या देवालयामध्यें श्री० बीडकर व श्री० रायखेलकर वगैरे सद्भक्तांनीं सुंदर दगडी ओवऱ्या बांधाविल्या आहेत. परंतु यावरील सर्व कामास बरीच वर्षें झाल्यामुळें हल्लीं या देवालयातील बराच महत्त्वाचा भाग म्हणजे पूर्वद्वारावरील लांकडी सभामंडप दक्षिणेकडील नादुरुस्त झालेल्या दगडी ओवऱ्या व दरवाजाचें राहिलेलें अपुरें काम. तसाच उत्तर बाजूचा

पडलेला दगडी तट व त्यावरील ओवऱ्या वगैरे भाग अत्यंत जीर्ण झाल्यामुळें येथें येणाऱ्या यात्रेकरूंलोकांची उतरण्याची अत्यंत गैरसोय होत असल्यामुळें श्रीक्षेत्र मजकूर येथें सदहू देवालयाची दुरुस्ती करण्याकरितां ता. १८-१२-२२ इ० रोजीं जीर्णोद्धार कमिटी स्थापन करण्यांत आली आहे. सदर कमिटीनें आज सतत एक वर्षपर्यंत भिक्षावृत्तीवर जीर्णोद्धारचें काम चालविलें असून सन १९२२ सालीं निरानदीस अकस्मात भयंकर पूर येऊन उध्वस्त झालेल्या येथील नीरानदीच्या घाटाचें व बुरुजाचें काम पूर्ण केलें व झालेल्या कामाचा अहवाल ता० २३।१०।२३ च्या ‘ केसरी ’ अंकांत प्रसिद्ध केला आहे. या संस्थेचा उद्देश जीर्णोद्धाराचें काम करण्याचा असूनही या क्षेत्रामध्यें धार्मिक शिक्षणाकरितां संस्कृत पाठशाळा, वेदशाळा, तसेंच गोरक्षण इत्यादि लोकोपयोगीं संस्था निरंतर चालविण्याचा आहे. वरील कामें अतिशय खर्चाची

असल्यामुळें या कार्याकरितां कायमचा फंड म्हणून एक लक्ष रुपये जमा केल्याखेरीज ही संस्था स्वावलंबी व यशस्वी होणार नाहीं म्हणून संस्थेनें कायमचा फंड जमविण्याचें कार्यास सुरवात केली असून संस्थेचे प्रचारक हे हल्लीं मदतीकरितां फिरत आहेत. तरी सर्व दर्जाच्या व ज्ञातींच्या हिंदुधर्माभिमानी जनतेनें या धार्मिक सत्कृत्यास हस्तें परहस्तें द्रव्यद्वारां उदार अंतःकरणानें योग्य मदत करून एक उपयुक्त व धार्मिक संस्था चालविल्याचें श्रेय पदरीं बांधून घ्यावें अशी संस्थेची सर्वत्रांना नम्रतापूर्वक विनंती आहे.

---

या कमिटीचे सभासद १७ आहेत.

अध्यक्ष,

**नारायण कृष्ण देशपांडे तडवळेकर.**

व्यवस्थापक,

**शामराज विश्वनाथ वांकर.**

**व**

**श्रीनिवास उमाकांत डिंग्रे.**

खजिनदार

**व्यंकटेश चिंतामण क्षीरसागर,**

कारभारी संस्थान विंचूरकर.

जीर्णोद्धारासंबंधानें जीं जीं कामें होतील तीं खालील पंचाच्या देखरेखीखालीं होणार आहे

१ **नरहर गणेश काकडे. इनामदार.**

१ **कृष्णराव केशव इंगळे. देवस्थान ट्रुस्टि. नरसिंहपूर.**

१ **गोपाळ कृष्णराव दंडवते. इनामदार.** पेन्शनर असिस्टंट फॉरेस्ट कान्झर्वेटर संस्थान निजाम हैद्राबाद व देवस्थान ट्रुस्टी निरानरसिंहपूर.

**१ रंगनाथ नरहर देवळे,** अकौंटंट ऑडिट आफिस बार्शी लाइट रेलवे.

**१ रामचंद्र धोंडदेव दंडवते.**

पुजाधीकारी कमिटीचे प्रचारक वर्गणी जमा करण्याकरितां ठिकठिकाणीं जाऊन वर्गणी दिल्याबद्दल छापील पावती देतील. परंतु त्यांचें जवळ असलेलें कमिटीचें लेखी अधिकार पत्र पाहून वर्गणी दारानी वर्गणी देण्यांची कृपा करावी.

**आपला नम्र**

**आत्माराम दत्तात्रय दंडवते.**

श्री.

रा० रा० गोपाळ कृष्ण दंडवते व कृष्णाजी केशव इंगळे वगैरे रा० श्री क्षेत्र नीरानृसिंहपूर यांसी नमस्कार वि० वि० श्रीक्षेत्र नीरानृसिंहपूर येथें नीरानदीचे अकस्मात् पुरानें श्रीनृसिंह देवालयाचे असपासचे जें घाटाचें वगैरे नुकसान झालें आहे, त्याकरितां तुम्हीं सर्वांनीं सार्वजनिक वर्गणीचें काम सुरूं केलें आहे तें मला पसंत आहे, व तुम्हीं आम्हांस विनंति केल्याप्रमाणें आम्हांस जी योग्य मदत करावयाची आहे. ती आम्हीं मोठ्या आनंदानें करूं. तसेच, इकडील संस्थानचे कारभारी व्यंकटेश चिंतामण यांस तुम्हीं खजिनदार नेमलें आहे म्हणून लिहिलें आहे, त्यास इकडील संमति आहे. हें काम त्यांनीं योग्य रीतीनें करण्याबद्दल मीं त्यांस हुकूम दिला आहे. या कामासंबंधानें आम्ही विशेष काळ-

जीर्ने लक्ष ठेवूं. वर्गणीचें कामास श्रीलक्ष्मीनृसिंह लोकांत प्रेरणा उत्पन्न करून तुम्हांस सदर कामासाठीं हातभार लावण्यासाठीं सद्बुद्धि देवो, अशी श्रींस प्रार्थना करितों. ता. १७।२।२३ ई०

श्रीचरणीतत्पर,

**रामराव कृष्ण विंचूरकर,**

फ० क्ला० सरदार, सं० विंचूर.

